# KIRAN TUTORIALS

Std.: 10 (English)

## MARATHI BOOSTER 4

**Q.1** **कंसातील सूचनेनुसार वाक्यरुपांतर करा.उद्गारार्थी / आज्ञार्थी ...**

**1** मला डबा देशील का? (आज्ञार्थी करा)

**Ans** मला डबा दे.

**2** तुझा पेन मला देशील का ? (आज्ञार्थी करा)

**Ans** तुझा पेन मला दे.

**3** सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. (उद्गारार्थी करा)

**Ans** अहाहा! किती छान अभ्यास होतो सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात!

**4** तुझं वर्ष कसं वाया जाईल? (विधानार्थी वाक्य करा)

**Ans** तुझं वर्ष वाया जाणार नाही.

**5** मी त्यांना विसरलो आहे. (प्रश्नार्थी करा.)

**Ans** मी त्यांना कसा विसरू शकेन ?

KIRAN TUTORIALS
Where Success begins...

**6** हे गुलाबाचे फूल खूप सुंदर आहे. (उद्गगारार्थी करा.)

**Ans** किती सुंदर हे गुलाबाचे फूल !

**7** मी आपल्या सेवेसाठी आलो असतो. (प्रश्नार्थी करा)

**Ans** मी आपल्या सेवेसाठी आलो नसतो का ?

**8** तिथे भयंकर अपघात झाला. (उद्गारार्थी करा)

**Ans** बाप रे ! फारच भयंकर ! अपघात झाला तिथे.

**9** तू रडत का बसलास ? (आज्ञार्थी करा)

**Ans** तू रडत बसू नको.

**10** मी काय सांगू ? (विधानार्थी करा)

**Ans** मला काही सांगायचे नाही.

**11** नियमितपणे शाळेत जावे. (प्रश्नार्थी करा)

**Ans** किती वाजता शाळेत जाणार आहेस ?

**12** तू रडत का बसलास ? (आज्ञार्थी करा)

**Ans** तू रडत बसू नको.

**13** शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले. (प्रश्नार्थक करा)

**Ans** शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काही दिले का?

**14** तू फार मोठा हायेस का? (उद्गारार्थी करा)

**Ans** बापरे ! तू लई मोठा हायेस !

**15** मुलांनी डोंगरातून का फिरू नये ? (आज्ञार्थी करा)

**Ans** मुलांनी डोंगरातून फिरावे. किंवा मुलांनो डोंगरातून फिरा.

**16** रोज व्यायाम करावा. (आज्ञार्थी करा.)

**Ans** रोज व्यायाम करा.

**17** ती पुस्तक वाचते. (प्रश्नार्थी करा)

**Ans** तू पुस्तक वाचलेस का ?

**18** लाडू चांगले आहेत. (उद्गारार्थी करा)

**Ans** व्वा ! काय चवीष्ट लाडू आहेत हे !

**19** आळस झटकून टाकावा. (आज्ञार्थी करा)

**Ans** आळस झटकून टाका.

**20** किती सुंदर आहे ताजमहल ! (विधानार्थी करा.)

**Ans** ताजमहाल फारच सुंदर आहे.

**21** ही पिल्ले खूपच गोंडस आहेत. (उद्दगारार्थी करा)

**Ans** व्वा ! किती गोंडस पिल्ले आहेत ही !

KIRAN TUTORIALS
Where Success begins...

**22** क्रिकेटचा खेळ छान खेळ. (उद्गारार्थी करा)

**Ans** शाब्बास ! किती सुंदर खेळलास क्रिकेटचा खेळ !

**23** मुलांनी शिस्तीने वागले पाहिजे. (आज्ञार्थी करा)

**Ans** मुलांनो शिस्तीने वागा.

**24** आपण त्यांना समजून घ्यायला हवे (प्रश्नार्थी करा)

**Ans** आपण त्यांना समजून घ्यायला नको का ?

**25** तिथे खूपच घाण आहे. (उद्दगारार्थी करा)

**Ans** शी ! किती घाण आहे ही !

**26** भिका-याला शाली शोभणार नाहीत. (प्रश्नार्थी करा.)

**Ans** भिका-याला शाली शोभणार का ?

**27** देखावा खूपच सुंदर आहे. (उद्गारार्थी करा)

**Ans** अहाहा ! किती सुंदर देखावा हा !

**28** अबब! केवढा हा साप! (विधानार्थी करा.)

**Ans** हा खूप मोठा साप आहे.

**29** तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. (उद्गारार्थी करा)

**Ans** किती आनंद झाला तुझ्या भेटीने !

**30** पांढरा रंग सगळ्यांना आवडतो. (प्रश्नार्थी करा)

**Ans** पांढरा रंग कोणाला आवडत नाही ?

**31** नियमितपणे शाळेत जावे. (प्रश्नार्थी करा)

**Ans** किती वाजता शाळेत जाणार आहेस ?

**32** हे अक्षर खूप चांगले आहे. (आज्ञार्थी करा)

**Ans** चांगले अक्षर काढा.

**33** विजयी हो ! (विधानार्थी करा)

**Ans** तू विजयी व्हावेस असे मला वाटते.

**34** पांढरा रंग कोणाला आवडत नाही? (विधानार्थी करा.)

**Ans** पांढरा रंग सगळ्यांना आवडतो.

**35** मी बॅट घेऊन मित्रांना दाखवत सुटलो. (आज्ञार्थी करा)

**Ans** तू बॅट मित्रांना दाखव.

**36** किती उंच इमारत ही ! (विधानार्थी करा)

**Ans** ही इमारत खूप उंच आहे.

**37** दररोज अभ्यास कर. (विधानार्थी करा.)

**Ans** दररोज अभ्यास करावा.

KIRAN TUTORIALS
Where Success begins...

**38** अबब ! केवढा हा साप ! (विधानार्थी करा.)

**Ans** साप खूप मोठा आहे.

**39** निरंजन एकदम सावध झाला. (आज्ञार्थी करा)

**Ans** निरंजन सावध हो.

**Q.2** **खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **76**

**1** बरबाद होणे →

**Ans** बरबाद होणे → **नाश होणे**
**वाक्य -** गरिबीत जीवन जगणा-या लोकांचे जीवन गरिबीतच बरबाद होते.

**2** पारंगत असणे →

**Ans** पारंगत असणे - **कुशल असणे.**
**वाक्य** - रघु बढाया मारण्यात पारंगत होता

**3** उसंत न लाभणे → ...............

**Ans** उसंत न लाभणे → **वेळ न मिळणे.**
**वाक्य** → क्रिकेटच्या सामन्याच्यावेळी परिक्षेचा अभ्यास करायला चैतन्यला उसंत मिळत नाही.

**4** गहाण ठेवणे →

**Ans** गहाण ठेवणे → **तारण ठेवणे.**
**वाक्य -** आमचे घर बांधण्यासाठी बाबांनी गाडी गहाण ठेवली.

5 उत्कंठा वाढणे →

Ans उत्कंठा वाढणे - **कुतूहल वाढणे**
**वाक्य** - अमोलला परीक्षेत मिळणाऱ्या गुणांची उत्कंठा वाढली होती.

6 रममाण होणे →

Ans रममाण होणे. - **मग्न होणे.**
**वाक्य** - सुधा गाणे गाण्यात रममाण होती.

7 जीवाला मुकणे →

Ans जीवाला मुकणे → **प्राण गमावणे.**
**वाक्य -** मांजराच्या हाती लागून उंदीर जीवाला मुकला.

8 नाव उज्ज्वल करणे →

Ans नाव उज्ज्वल करणे → **नाव उंचावणे.**
**वाक्य -** आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये राजसने बुद्धिबळ खेळात शाळेचे नाव उज्ज्वल केले.

9 पश्चाताप होणे →

Ans पश्चाताप होणे → **केलेल्या चुकीची जाणीव होणे.**
**वाक्य -** वाईट केलेल्या कामाचा प्रदीपला पश्चाताप झाला होता.

10 चक्कर मारणे → ..............

Ans चक्कर मारणे → **फेरफटका मारणे.**
**वाक्य** → रात्री जेवण झाल्यावर आम्ही सर्व चक्कर मारायला जातो.

KIRAN TUTORIALS
Where Success begins...

11 पारंगत असणे →

Ans पारंगत असणे → **कुशल असणे.**
**वाक्य -** गणपतीच्या मूर्ती कलेत रेखा पारंगत आहे.

12 खादडपण येणे →

Ans दडपण येणे - **मनावर दबाव येणे**
**वाक्य** - परीक्षेच्या दिवसात अभ्यासाचे चैतन्याच्या मनावर दडपण येते

13 अंगाचा तिळपापड होणे →

Ans अंगाचा तिळपापड होणे → **खूप संताप येणे.**
**वाक्य -** वर्गात विद्यार्थ्यांनी चालवलेला गोंधळ पाहून शिक्षकांच्या अंगाचा तिळपापड झाला.

14 हेवा वाटणे →

Ans हेवा वाटणे → **मत्सर वाटणे.**
**वाक्य -** मानसीने केलेल्या उत्कृष्ट वकृत्व भाषणाच्या सर्वांनी केलेल्या कौतुकाने सीमाला मानसीचा हेवा वाटला.

15 पार करणे →

Ans पार करणे → **अंतर कापणे.**
**वाक्य -** जहाज पाण्यातील अंतर वेगाने पार करत होते.

16 सामना करणे →

Ans सामना करणे → **मुकाबला करणे.**
**वाक्य -** गावात आलेल्या वाघाशी दत्तू पैलवानाने सामना केला.

17 अंगावर सरसरून काटा येणे →

Ans अंगावर सरसरून काटा येणे - **भीतीने शहरणे.**
**वाक्य** - गायींच्या गोठयात बिबळ्याला पाहताच माझ्या अंगावर सरसरून काटा आला.

18 डोळे भरून पाहणे →

Ans डोळे भरून पाहणे - **ममत्वाने कौतुकाने बघणे.**
**वाक्य** - लढाईत विजय प्राप्त करून येणाऱ्या आपल्या मुलाकडे आई डोळे भरून पाहत होती.

19 थक्क होणे →

Ans थक्क होणे - **आश्चर्यचकित होणे.**
**वाक्य** - दिव्यांग मुलांनी काढलेली चित्रे पाहून सर्वजण थक्क झाले.

20 भास होणे →

Ans भास होणे → **चाहूल लागणे, भ्रम होणे.**
**वाक्य -** स्वप्नात रितेशला २५,०००० लाख रु. मिळाल्याचा भास झाला.

21 कवेत घेणे →

Ans कवेत घेणे - **मिठीत घेणे**
**वाक्य** - बऱ्याच वर्षांनी परदेशातून आलेल्या आपल्या मुलाला वडिलांनी कवेत घेतले.

22 कीव येणे →

Ans कीव येणे → **दया येणे.**
**वाक्य -** गणित आले नाही म्हणून गुरूजींनी शंकरला मारताच मला त्याची कीव आली.

KIRAN TUTORIALS
Where Success begins...

23 आर्जव करणे →

Ans आर्जव करणे → **कळकळून विनंती करणे.**
**वाक्य -** झाडावर अडकलेल्या पतंग काढून देण्यासाठी शौनक मित्रांकडे आर्जव करत होता.

24 मरगळ झटकणे →

Ans मरगळ झटकणे - **आळस सोडणे**
**वाक्य** - संध्याकाळी क्रिकेट खेळाला मिळणार म्हणून अभ्यास करण्यासाठी जितेंद्रने मरगळ झटकून टाकली.

25 मांडणी करणे →

Ans मांडणी करणे - **रचना करणे**
**वाक्य** - दुकानात पुस्तकांची वैविध्यपूर्ण मांडणी केली होती.

26 अधःपतन होणे →

Ans अधःपतन होणे → **दर्जा घसरणे**
**वाक्य** → आपल्या कार्यात नीट लक्ष न दिल्यामुळे अजितच्या कामाचे अधःपतन झाले.

27 ललकार घुमवणे →

Ans ललकार घुमवणे → **जयजयकार करणे.**
**वाक्य -** निवडणूकीत एखादा पक्ष विजयी झाला की सर्वत्र ललकार घुमतो.

28 आनंद गगनात मावेना →

Ans आनंद गगनात मावेना → **खूप खूप आनंद होणे.**
**वाक्य -** वाढदिवसाला मित्रांकडून मिळालेल्या अनपेक्षित भेटीने माझा आनंद गगनात मावेनासा झाल.

29 जीव ओवाळणे →

Ans जीव ओवाळणे - **जीवन कुर्बान करणे**
**वाक्य** - भारतीय सैनिक शत्रूसैन्याशी लढून भारतमातेसाठी जीव ओवाळून टाकतात.

30 अंगाचा तिळपापड होते →

Ans अंगाचा तिळपापड होते - **खूप राग येणे.**
**वाक्य**- वर्गात गोंधळ घालताना मुलांना पाहून शिक्षकांच्या अंगाचा तिळपापड झाला.

31 भारावून जाणे →

Ans भारावून जाणे - **प्रभावित होणे.**
**वाक्य** - स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुण्यांनी केलेले भाषण ऐकून मुले प्रभावित झाली.

32 टाळ्यांचा कडकडाट होणे →

Ans टाळ्यांचा कडकडाट होणे → **टाळ्या सतत वाजवून कौतुक करणे.**
**वाक्य -** अजितला बुद्धिबळ स्पर्धेतील पहिल्या क्रमांकाचे बक्षिस देताना सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

33 स्वप्न साकार करणे →

Ans स्वप्न साकार करणे → **भविष्यातील स्वप्न पूर्ण करणे.**
**वाक्य -** अंकुशने अभिनेता होण्याचे आपले स्वप्न साकार केले.

34 थक्क होणे →

Ans थक्क होणे → **आश्चर्यचकित होणे.**
**वाक्य** → नेहमी परिक्षेत कमी गुण मिळवणा-या राजाने प्रथम क्रमांक मिळवल्याने सर्व थक्क झाले.

KIRAN TUTORIALS
Where Success begins...

35 पुष्टी देणे →

Ans पुष्टी देणे - **पाठिंबा देणे**
**वाक्य** - निवडणूकीत प्रत्येक पक्षाला जनलोकांची पुष्टी देतात.

36 अंगावर काटा उभा राहणे →

Ans अंगावर काटा उभा राहणे → **भीतीने शहारा येणे**.
**वाक्य -** समोर पिवळाधम्मक मोठा नाग पाहताच आमच्या अंगावर काटा उभा राहिला.

37 हात राबणे →

Ans हात राबणे - **कष्टाची कामे करणे**
**वाक्य** - शेतात शेतकरी हात राबत असतात.

38 हातभार लावणे →

Ans हातभार लावणे → **मदत करणे.**
**वाक्य -** संयोगिता आईला कामात नेहमी हातभार लावत असते.